13-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/12/2025 11:03 PM Page 1



जुनाट आंब्याच्या झाडाने घेतला दुचाकीस्वाराचा बळी पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com

भारताने महिला एकदिवसीय तिरंगी मालिका जिंकली पान ४ वर

वेर्णा, मंगळवार, १३ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४

| REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 250 | Verna, | facebook.com/dainikherald | Tuesday 13 May 2025 | Pages 4 | ₹ 4

निवडक

पाकिस्तान चीनचा होणार जळफळाट

नवी दिल्ली, दि. १२ : पहलगाममध्ये दहशतवादी हल्ला झाला, या हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर दिले आहे. भारताने पाकव्याप्त काश्मीरमध्ये आणि पाकिस्तानमध्ये केलेल्या एअर स्ट्राईकमध्ये दहशतवाद्यांचे ९ अड्डे उद्ध्वस्त करण्यात आले आहेत. या हल्ल्यात जवळपास १०० हून अधिक दहशतवादी ठार झाले, त्यानंतर आता पाकिस्तान पुन्हा एकदा असा भ्याड हल्ला करण्याचा विचारही करणार नाही. भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तानचा चांगलाच जळफळाट झाला होता, पाकिस्तानने देखील भारतावर हल्ल्याचा प्रयत्न केला, मात्र भारताने हा हल्ला परतून लावला, त्यानंतर भारताने केलेल्या हल्ल्यामध्ये पाकिस्तानचे मोठे नुकसान झाले आहे, पाकिस्तानचे अनेक एअरबेस उद्ध्वस्त करण्यात आले.

दरम्यान त्यानंतर अमेरिकेच्या मध्यस्थीने भारत आणि पाकिस्तानने युद्धविरामाची घोषणा केली. भारताने आपल्या अटींवर युद्धविरामाची घोषणा केली आहे. पाकिस्तानला चीनकडून देखील मदत करण्यात आली, चीनकडून पाकिस्तानला युद्धसामग्री पुरवण्यात आली, मात्र ही सर्व शस्त्र भारताविरोधात कुचकामी ठरली आहेत.

देशातील ३२ विमानतळ काही दिवस बंद

नवी दिल्ली, दि. १२ : भारत-पाकिस्तान तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर देशातील ३२ विमानतळ काही दिवसांसाठी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. त्यामागे कारण देखील तसंच होतं. पाकिस्तानकडून सलग तीन दिवस रात्रीच्या वेळी ड्रोन हल्ले करण्यात आले. तसेच सीमाभागात अनेक ठिकाणी गोळीबार करण्यात आला. पाकिस्तानच्या हल्ल्याला भारतानेदेखील चोख प्रत्युत्तर दिलं. भारताने पाकिस्तानच्या एअरबेसवर हल्ला केला. भारतीय वायुसेनेकडून करण्यात आलेल्या हल्ल्यात पाकिस्तानच्या एअरबेसचं मोठं नुकसान झालं आहे. हल्ला आणि प्रतिहल्ला यामुळे दोन्ही देशांमधील तणाव वाढला होता. पाकिस्तानने भारतीय एअरबेसवरही हल्ला करण्याचा प्रयत्न केला होता. पण त्यांचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. भारताने पाकिस्तानचे सर्व हल्ले हाणून पाडले. याउलट भारताच्या प्रतिहल्ल्यात पाकिस्तानचं जास्त नुकसान झालं. दोन्ही देशांमध्ये ताणले गेलेले संबंध पाहता भारताने प्रवाशांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर ३२ विमानतळांची नागरी सेवा बंद केली होती. याचबाबत आता महत्त्वाची अपडेट समोर आली आहे.

पाकने किराना हिल्समध्ये दडवलंय काय?

इस्लामाबाद, दि. १२ : ऑपरेशन सिंदूरची माहिती देण्यासाठी भारताच्या तिन्ही दलांनी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. भारताने पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर हल्ले केले. आमचे लक्ष्य केवळ दहशतवाद्यांचे अड्डे होते. पण त्यांच्या बाजूने पाकिस्तानी लष्कर उतरले. त्यामुळे आम्हाला नाईलाजास्तव पाकिस्तानी सैन्याला, त्यांच्या तळांना लक्ष्य करावे लागले, ही बाब भारतीय सैन्याने निक्षून सांगितली. या पत्रकार परिषदेला तिन्ही दलांचे वरिष्ठ अधिकारी हजर होते. त्यांना किराना हिल्सबद्दल एक प्रश्न विचारण्यात आला. त्यानंतर सोशल मीडियावर किराना हिल्सची चर्चा सुरु झाली. आम्ही पाकिस्तानच्या अण्वस्त्र तळांना लक्ष्य केले नसल्याचे भारतीय सैन्याने पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. यानंतर अनेकांनी इंटरनेटवर जाऊन किराना हिल्सबद्दल सर्च केले. सॅटेलाईट फोटोंमध्ये सरगोधातील मुशफ विमानतळाच्या धावपट्टीवर झालेला हल्ला झाल्याचे दाखवण्यात आले.

गोव्यात अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचा केंद्राचा विचार?

■ टीम दैनिक हेराल्ड :

पणजी, दि. १३ : राज्यातील ऊर्जासुरक्षा आणि शाश्वततेसाठी दीर्घकालीन उपाययोजनांच्या अनुषंगाने गोव्यात अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याची शक्यता तपासावी, असा सल्ला केंद्रीय ऊर्जा, शहरी विकास आणि गृहनिर्माण मंत्री मनोहर लाल खट्टर यांनी राज्य सरकारला दिला आहे.

▶ २४७ पाणीपुरवठा योजनेसाठी विशेष निधीचीही मागणी

सोमवारी झालेल्या आढावा बैठकीत त्यांनी गोव्यातील वीज क्षेत्र आणि शहरी विकास योजनांच्या अंमलबजावणीची पाहणी केली. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, ऊर्जा मंत्री सुदिन ढवळीकर, शहरी विकास मंत्री विश्वजित राणे तसेच विविध वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते. खट्टर म्हणाले, गोव्यात सध्या औष्णिक, जलविद्युत किंवा सौर प्रकल्प नाहीत. राज्यातील सुमारे ८० टक्के वीज ही इतर राज्यांतून खरेदी केली जाते. त्यामुळे दीर्घकालीन ऊर्जासुरक्षेसाठी अणुऊर्जा प्रकल्पाची शक्यता तपासून केंद्राकडे प्रस्ताव पाठवावा.

त्यांनी गोवा सरकारच्या एटी अँड सी तोटा कमी करण्याच्या प्रयत्नांचे कौतुक केले. गोव्यात हा तोटा ९.३२ टक्क यांपर्यंत खाली आणण्यात आला आहे, जे राष्ट्रीय सरासरीपेक्षा खूपच कमी आहे. हे वीज वितरण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे द्योतक आहे, असे खट्टर म्हणाले.

आरडीएसएस (सुधारित वितरण क्षेत्र योजना) अंतर्गत पायाभूत सुविधांच्या कामांमध्ये झालेली प्रगती लक्षणीय असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र स्मार्ट मीटरिंगच्या अंमलबजावणीस गती देण्याचे निर्देश दिले. स्मार्ट मीटरमुळे डेटा विश्लेषण, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मशीन लर्निंगच्या सहाय्याने ग्राहक सहभाग वाढवता येतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

सरकारी कार्यालये, वसाहती, व्यावसायिक व औद्योगिक युनिट्स आणि उच्च वीज वापर असलेल्या ग्राहकांमध्ये प्राधान्याने स्मार्ट मीटर बसवण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

ऊर्जा कार्यक्षमतेसाठी आणि खर्च नियंत्रणासाठी युटिलिटी नुकसान आणखी कमी करणे आणि ग्रिडमध्ये जास्तीत जास्त अक्षय ऊर्जा समाविष्ट करणे आवश्यक असल्याचेही खट्टर यांनी सांगितले. छतावरील सौर प्रकल्प व नवीन वीज जोडण्याच्या प्रक्रियेत नागरिकाभिमुखता दर्शवणाऱ्या गोवा सरकारच्या प्रयत्नांचीही त्यांनी प्रशंसा केली.

मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी २४ तास जलपुरवठा करणाऱ्या 'ड्रिंक फ्रॉम टॅप' योजनेसाठी केंद्राकडे विशेष निधीची मागणी केली. या योजनेची एकूण किंमत अंदाजे ₹६५२.६१ कोटी असून, अमृत २.० अंतर्गत सुमारे ₹३२६.३० कोटींचा निधी आधीच मंजूर झाला आहे. डॉ. सावंत यांनी गोव्याच्या विशिष्ट नागरी समस्यांकडे लक्ष वेधले. पर्यटक संख्येच्या तुलनेत नागरी पायाभूत सुविधांवर होणारा अतिरिक्त ताण लक्षात घेऊन गोव्याला विशेष बाब म्हणून अधिक सहकार्य अपेक्षित आहे, असे ते म्हणाले.

खट्टर यांनी राज्य सरकारला पुढील गोष्टींवर भर देण्याचे निर्देश दिले:अमृत योजनेतील सर्व प्रलंबित जलवाहिनी व गटार कनेक्शन कामे पूर्ण करणे, सामुदायिक व सार्वजनिक शौचालये, घनकचरा व्यवस्थापन, एसटीपी सुविधा आदींसाठी निविदा प्रक्रिया जलद करणे, पीएम-आवास योजना अंतर्गत परवडणाऱ्या घरांसाठी प्रस्ताव सादर करणे, पीएम-स्वनिधी अंतर्गत रस्त्यावरील विक्रेत्यांचा डेटा संकलित करणे आणि कर्ज वाटपात महिलांचा सहभाग वाढवणे या गोष्टींवर सरकारने लक्ष केंद्रीत करावे अशा सूचना त्यानी केल्या . केंद्रीय ऊर्जा मंत्र्यांनी राज्याला पीएम ई-बस सेवा योजनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. यासोबतच, स्मार्ट सिटी व डीएवाय-एनयूएलएम योजनेतील प्रगतीचाही त्यांनी आढावा घेतला.

विराट कोहली कसोटीतून निवृत्त!

नवी दिल्ली, दि. १२ :

▶ अनेक मोठ्या विक्रमांना गवसणी

▶ क्रिकेट जगतात खळबळ उडाली

भारताचा दिग्गज क्रिकेटर विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. अलिकडेच रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली होती. त्यानंतर आता विराटनेही अचानक कसोटीतून निवृत्ती घेतल्यामुळे क्रिकेट जगतात खळबळ उडाली आहे.

विराटने गेल्या वर्षीच भारताने टी२० विश्वचषक जिंकल्यानंतर टी२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. आता तो कसोटीतूही निवृत्त झाला. त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीत अनेक मोठ्या विक्रमांना गवसणी घातली आहे. विराटचा फिटनेस पाहता तो टीम इंडियासाठी आणखी ३-४ वर्ष खेळू शकला असता.

कसोटी क्रिकेटमध्ये विराट कोहलीची बॅट गेल्या काही काळापासून शांत राहिली होती. गेल्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात वारंवार एकाच पद्धतीने बाद झाल्याने तो बराच निराश झाला होता. ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूंवर तो विकेटच्या मागे बाद होत होता. मालिकेच्या पहिल्या सामन्यात कोहलीने शतक झळकावले असेल, परंतु त्यानंतर त्याची कामगिरी खूपच खराब होती. या मालिकेत भारताला १-३ असा पराभव पत्करावा लागला. त्याआधी, जेव्हा न्यूझीलंडने भारताला त्यांच्याच भूमीवर ३-० असा व्हाईटवॉश दिला होता, तेव्हाही कोहलीची बॅट शांतच होती. तो ३ सामन्यांमध्ये एकत्रितपणे १०० धावा करू शकला नाही. त्याच्या बॅटमधून १५.५०च्या सरासरीने फक्त ९३ धावा आल्या. या दोन्ही मालिकांमुळे कदाचित विराट कोहलीला हा निर्णय घ्यावा लागला असेल.

२०११ मध्ये कसोटी पदार्पण करणाऱ्या विराट कोहलीने २०१९ पर्यंत कसोटी क्रिकेटवर राज्य केले. या काळात त्याची फलंदाजीची सरासरी (५४.९७) जवळपास ५५ होती. यादरम्यान त्याने २७ शतके झळकावली होती. तो फॅब-४ मध्ये जो रूट, केन विल्यमसन आणि स्टीव्ह स्मिथपेक्षा जास्त शतके ठोकणारा खेळाडू होता. पण २०२० सुरू होताच, त्याच्या कामगिरीत सतत घसरण दिसून आली.

(सविस्तर वृत्त पान ४ वर)

२.८८ कोटींची बेकायदेशीर दारू जप्त करणाऱ्या उपनिरीक्षकावरच कारवाई

▶ देऊ राऊत यांची तातडीने बदली; उत्पादन शुल्क विभागात खळबळ

▶ पत्रादेवी चेकपोस्टवर झाली होती कारवाई

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. १२ : पत्रादेवी येथील उत्पादन शुल्क चेकपोस्टवर दोन कोटी ८८ लाख ९३ हजार रुपयांच्या बेकायदेशीर दारूच्या साठ्यावर कारवाई करणाऱ्या उत्पादन शुल्क विभागाचे उपनिरीक्षक देऊ राऊत यांची तातडीने बदली करण्यात आली आहे. या कारवाईनंतर लगेचच आलेल्या बदल्यामुळे उत्पादन शुल्क विभागात प्रचंड खळबळ उडाली असून, ही शिक्षा आहे की पुरस्कार, असा प्रश्न उपस्थित होत आहे. राऊत यांच्या बदलीमागे प्रशासनातील शुक्राचार्य कोण? याबद्दल सध्या उत्पादन शुल्क विभागात चर्चा सुरू आहे . कोट्यवधीची दारू जप्त करणाऱ्या अधिकाऱ्यावर जर बदलीची कारवाई होत असेल तर सरकार भ्रष्टाचार करणाऱ्यांच्या पाठीशी आहे की, भ्रष्टाचार रोखणाऱ्यांच्या ? असा सवाल सर्वसामान्य जनतेतून उपस्थित केला जात आहे .

६ मे २०२५ रोजी सायंकाळी सुमारे ५.१५ वाजता, उपनिरीक्षक देऊ राऊत व त्यांच्या पथकाने नियमित तपासणीदरम्यान एक टेम्पो (एचआर -५८ -डी - ०७५२) अडवला . सदर वाहनाची तपासणी केली असता त्यात मोठ्या प्रमाणावर विविध प्रकारची स्कॉच, व्हिस्की व व्होडका असा दारूचा साठा आढळून आला.

या दारूचा एकूण अंदाजे बाजारमूल्य रु. २ कोटी ८८ लाख ९३ हजारअसून, सदर वाहनाची किंमत अंदाजे रु. २० लाख रुपये आहे.

वाहन चालक रणजीत पासवान (रा. देवरिया, उत्तर प्रदेश) याच्याकडे दारू वाहतुकीसाठी आवश्यक असलेले परवाने किंवा कागदपत्रे उपलब्ध नव्हती. त्याने सादर केलेली इनव्हॉइस व कस्टम दस्तऐवज शंकास्पद असल्याचे पथकाने नमूद केले. त्यानंतर या प्रकरणी गोवा उत्पादन शुल्क कायदा १९६४ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.ही कारवाई उपनिरीक्षक देऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली भारत गावकर, सखाराम पालयेकर, सुभाष गावस व पुंडलिक शिरोडकर यांनी केली.

पान २ ▶

जप्त केलेल्या दारूचा तपशील पुढीलप्रमाणे:

Glenlivet १२ - १०० बॉक्स
Glenlivet 18 YO Malt Scotch -५० बॉक्स
Royal Salute २१ - ५० बॉक्स
Chivas Regal 12 YO- १०० बॉक्स
Jameson Irish - १०० बॉक्स
Perfect Vodka Blue - १०० बॉक्स
Ballantine's Finest Scotch- १०० बॉक्स
Chivas Regal YO Whisky - १०० बॉक्स

कोमुनिदाद व आल्वारा जमिनीवरील बेकायदा बांधकामे नियमीत करणार?

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. १२ : सर्वोच्च न्यायालयाने सरकारी व कोमुनिदाद जमिनीवरील बेकायदा बांधकामांना कायदेशीर मान्यता देण्याच्या प्रयत्नांना स्पष्ट शब्दांत विरोध दर्शवला असतानाही, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी या बांधकामांना नियमित करण्यासाठी विशेष कायदा आणण्याची घोषणा केली आहे. डिचोली येथे सुमारे ६० कोटी रुपये खर्चून उभारल्या जाणाऱ्या प्रशासकीय इमारत व कला भवनाच्या पायाभरणी कार्यक्रमात ते बोलत होते.

मुख्यमंत्री सावंत यांनी सांगितले की, राज्यातील कोमुनिदाद व आल्वारा जमिनीवरील घरे आणि इतर बांधकामे मोठ्या प्रमाणावर बेकायदेशीर ठरवण्यात आली आहेत. यामुळे संबंधित नागरिकांमध्ये प्रचंड अस्वस्थता निर्माण झाली असून, या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सरकार लवकरच विशेष कायदा आणणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अलीकडील निर्णयात, वटहुकूम किंवा विधेयकाद्वारे बेकायदा बांधकामांना कायदेशीर दर्जा देण्याच्या पद्धतीला तीव्र आक्षेप घेतला आहे. अशा प्रकारच्या निर्णयांनी कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या कृत्यांना प्रोत्साहन मिळते, आणि त्यामुळे कायद्याची प्रभावी अंमलबजावणी अशक्य होते, असा न्यायालयाचा ठाम मतप्रदर्शन आहे.

मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने अलीकडेच बेकायदा बांधकामांवर कठोर निर्णय दिल्यानंतर, राज्य सरकारने अंमलबजावणीसाठी वेळ मागितली आहे. मात्र, विलंब झाल्यास तो न्यायालयीन अवमान ठरू शकतो. याच पार्श्वभूमीवर सरकारने वटहुकूम आणण्याची तयारी केली असली, तरी त्यावर न्यायालयात आव्हान घेतले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

डिचोलीत उभारण्यात येणाऱ्या प्रशासकीय इमारतीच्या पायाभरणी सोहळ्यात मुख्यमंत्री सावंत बोलत होते. यावेळी आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, आमदार प्रेमेंद्र शेट, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, जिल्हाधिकारी यशस्विनी बी., गोवा साधन सुविधा विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक हरीश हडकोणकर, उपजिल्हाधिकारी नेहाल तळावणेकर, जिल्हा पंचायत अध्यक्ष शंकर चोडणकर आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्य सरकार प्रशासन अधिक प्रभावी करण्यासाठी कटिबद्ध असून, आतापर्यंत २१२ हून अधिक सेवा ऑनलाईन करण्यात आल्या आहेत. कुळ-मुंडकर खटलेही त्वरीत निकाली काढण्यासाठी विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. डिचोलीमध्ये उभारण्यात येणाऱ्या नवीन इमारतीमुळे तालुक्यातील अनेक शासकीय कार्यालये भाडेपट्टीवरील जागांमधून सरकारच्या मालकीच्या इमारतीत स्थलांतरित होतील.

तसेच, डिचोलीतील इमारत ही धारबांदोडा तालुक्यात उभारलेल्या दर्जेदार प्रशासकीय इमारतीच्या धर्तीवरच बांधण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

जागतिक रस्ता सुरक्षा सप्ताहाची मडगावमध्ये सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि.१२ : जागतिक रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या निमित्ताने मडगाव शहरात सोमवारी पादचारी आणि सायकलस्वारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत जनजागृती मोहिमेला सुरुवात झाली. ग्राहक हक्कांसाठी कार्यरत 'गोवाकॅन' या संस्थेच्या पुढाकाराने, विविध सरकारी विभाग आणि स्थानिक नागरी संस्थांच्या सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला.

मोहिमेचा शुभारंभ शहरातील प्रमुख रस्त्यांवरून काढण्यात आलेल्या रॅलीने करण्यात आला. या रॅलीमध्ये वाहतूक विभाग, वाहतूक पोलिस, शहरी विकास विभाग आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

गोवाकॅन समन्वयक लोर्ना फर्नांडिस यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, गोव्यात अलीकडे झालेल्या बहु-

भागधारक बैठकीतून या उपक्रमाची कल्पना उदयास आली. आपले रस्ते हे सर्वांसाठी सुरक्षित असले पाहिजेत. केवळ वाहनचालकांसाठी नव्हे. पादचारी आणि सायकलस्वारांना दररोज असुरक्षित परिस्थितीतून जावे लागते, विशेषतः पायाभूत सुविधांचा अभाव असलेल्या शहरी भागात.

रॅलीदरम्यान विविध बॅनर्स, फलक आणि घोषणांच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा, जबाबदारीने वाहन चालविणे तसेच फूटपाथ, सायकल ट्रॅक आणि क्रॉसिंगसारख्या मूलभूत सुविधांची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली. यावेळी झेब्रा क्रॉसिंगचा वापर, वेग मर्यादा पाळणे आणि अन्य रस्त्याचा वापर करणाऱ्यांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देणे या बाबतीत मार्गदर्शन करणारी पत्रकेही वाटण्यात आली.

कार्यक्रमात सहभागी असलेल्या वाहतूक विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले, रस्ता सुरक्षा ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून ती प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी आहे. चांगल्या पायाभूत सुविधा आणि नागरिकांच्या वर्तनामधील सकारात्मक बदल या दोन्हींची नितांत आवश्यकता आहे. ही मोहीम म्हणजे त्या दिशेने टाकलेले पहिले पाऊल आहे.

मडगावमधील ही मोहिम राज्यभरात आयोजित करण्यात येणाऱ्या सातत्यपूर्ण उपक्रमांच्या मालिकेतील पहिली आहे. आयोजकांना आशा आहे की, या मोहिमांच्या माध्यमातून रस्त्यांचे नियोजन आणि वापर यामध्ये दीर्घकालीन सुधारणा साधता येतील. शहरांमध्ये वाढत चाललेल्या वाहतूक कोंडी आणि अपघातांच्या पार्श्वभूमीवर, अशा प्रकारच्या समावेशक रस्ता सुरक्षा उपक्रमांना अधिक गती मिळणे आवश्यक असल्याचे जाणकारांनी नमूद केले.

जागतिक पातळीवर साजरा केला जाणारा रस्ता सुरक्षा सप्ताह, पादचाऱ्यांच्या हक्कांना अधोरेखित करतो तसेच सुरक्षित आणि सर्वसमावेशक गतिशीलतेसाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक बदलांची गरजही अधोरेखित करतो.

आके पॉवर हाऊसजवळील अतिक्रमण हटविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. १२ : वीज विभागाच्या तक्रारीनंतर दक्षिण गोवा जिल्हाधिकारी कार्यालयाने मडगाव नगर परिषदेने (एमएमसी) -मडगाव येथील आके ,तसेच पॉवर हाऊस परिसरातील अतिक्रमण आणि अनधिकृत बांधकामे त्वरित हटवावीत, असे स्पष्ट आदेश दिले आहेत.आके

सेच, सदर अतिक्रमणे 'गोवा जमीन (बांधकाम प्रतिबंधक) कायदा, १९९५' च्या तरतुदींनाही विरोधात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. या कायद्यानुसार, सार्वजनिक मालमत्तांवर कोणतीही अनधिकृत बांधकामे किंवा कब्जा करण्यास सक्त मनाई आहे.

काशीनाथ शेट्ये यांनी पॉवर हाऊसजवळ सुरू असलेल्या स्टॉल्समुळे वारंवार कायदाचं उल्लंघन होत असल्याचं निदर्शनास आणून दिलं होतं. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे औपचारिक तक्रार दाखल करताना हे स्टॉल्स स्थानिक रहिवासी नसलेल्या व्यक्तींनी चालवत असल्याचे आणि काही प्रकरणांत राजकीय पाठबळ असल्याचेही नमूद केले होते. शेट्ये यांनी यापूर्वी संबंधित गाडा धारकांना जागा रिकामी करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, जिल्हाधिकाऱ्यांकडून नुकतेच मिळालेल्या स्पष्ट आदेशानंतरच या प्रकरणात ठोस हालचाल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. प्रशासनाच्या हस्तक्षेपानंतर मडगाव नगर परिषदेने येत्या काही दिवसांत अतिक्रमण हटविण्याची मोहीम हाती घेण्याची शक्यता असून, संबंधित विभागांना याबाबत सूचना दिल्या गेल्या आहेत.